**प्रेसनोट,** **दि.२०.१२.२०२३**

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातर्फे किंमती मुद्देमाल मुळ मालकांस प्रदान कार्यक्रम संपन्न**

आज दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री. विनयकमार चौबे यांचे संकल्पनेतून माला विरुद्धचे गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मुळ मालक तथा फिर्यादी यांना परत करण्याचा कार्यक्रम पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालय येथे पार पडला. सदर समारंभात एकुण १२५ वेगवेगळ्या गुन्ह्यांतील फिर्यादींना त्यांच मुद्दमाल परत करण्यात आला.

या कार्यक्रमात संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकुण १२५ वेगवेगळ्या गुन्ह्यांतील एकुण ४८४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ज्याची एकुण किंमत रु.२१,३७,१४०/- तसेच २ चारचाकी वाहने किंमत रु.२५,५०,०००/-, २२ मोटारसायकल किंमत रु.८,७०,०००/-, ६९ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल फोन किंमत रु.१४,८८,८९०/- विविध कंपन्यांमधुन चोरीस गेलेला मुद्देमाल व ३ लॅपटॉप एकुण किंमत रु.१,२३,१८,६८१/- तसेच सायबर गुन्ह्यांसह वेगवेगळ्या गुन्ह्यांमधुन जप्त केलेली रोख रक्कम रु.४८,९४,०००/- असा एकुण रक्कम रु. २,४२,५९,३६१/- (दोन कोटी बेचाळीस लाख एकोणसाठ हजार तीनशे एकसष्ट रुपये) किंमतीचा मुद्देमाल मुळ मालकांना मा. पोलीस आयुक्त सो. यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

विशेष म्हणजे मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे यांचे कार्यकाळात दुस-यांदा हा कार्यक्रम पार पडला. यापुर्वी दि.१०.०१.२०२३ रोजी महाराष्ट्र पोलीस रेझिंग डे चे औचित्य साधुन मा. पोलीस आयुक्त सो. यांचे शुभहस्ते वेगवेगळ्या ८४ गुन्ह्यांतील सुमारे १,४६,९३,७०५/- (एक कोटी सेहचाळीस लाख त्र्यान्नव हजार सातशे पाच रुपये) किंमतीचा मुद्देमाल मुळ मालक तथा फिर्यादींना परत करण्यात आला होता.

मा. पोलीस आयुक्त सो. यांनी या प्रसंगी फिर्यर्दींना उद्देशुन तुमच्या चेह-यावरचा आनंद पाहुन पोलीस अधिकारी म्हणुन आम्हाला आमच्या कामाची पावती मिळाली. तसेच यापुढे देखील असे कार्यक्रम वेळोवेळी आयोजित केले जातील जेणे करुन जनतेचे मनोबल वाढेल व अधिकाधिक फिर्यादी पुढे होवनु पोलीसांकडे आपल्या तक्रारी दाखल करतील असे मनोगत व्यक्त केले. तसेच ज्या पोलीस अधिका-यांनी सदर गन्ह्यांचया तपास करुन मुद्देमाल हस्तगत केला त्यांचे अभिनंदन देखील केले. याप्रसंगी ज्यांना आपला मुद्देमाल परत मिळाला अशा काही फिर्यादींनी देखील आपले मनोगत व्यक्त करुन पेलीसांचे आभार मानले.

सदर कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे, सह पोलीस आयुक्त, मा. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त व श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. विवेक पाटील, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, श्री. सतीश माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बाळासाहेब कोपनर, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे -१ व श्री. विवेक मुगळीकर, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, श्री. विठ्ठल कुबडे, सहायक पोलीस आयुक्त, एमआयडीसी भोसरी विभाग, श्री. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुकत, ाकड विभा, श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग हे उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक,
पीसीबी, गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड आयुक्तालय